Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५७ वे, अंक ५वा, मुंबई । जुलै २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 5, Mumbai I July 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## आषाढी एकादशीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५७वे, अंक ५वा,
जुलै २०२४
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in

## विद्यार्थी गुणगौरव सोहळा, मुंबई









HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
UL LISTED
FM APPROVED
VdS
CE
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

Best Wishes From

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)
Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

# संपादकीय

प्रिय बंधू भगिनींनो, आपल्या देशाच्या लोकसभेच्या निवडणूका जून महिन्यामध्ये पार पडल्या असून आपले सर्वांचे आवडते व लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्रभाई मोदी यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान भूषविण्याचा मान मिळवला आहे. आपला भारत देश देशातील तिसरी बलाढ्य अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीने अग्रसेर असून आपण सर्वांनी ते साध्य होण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत आणि मला विश्वास आहे की, आपल्यासारख्या देशप्रेमी नागरिकांकडून यादृष्टीने योग्य ती पावले उचलली जातील.

मला कळविण्यास आनंद वाटतो की, जसा आपल्या देशाच्या निवडणूका यशस्वीपणे पार पडल्या. त्याचप्रमाणे आपल्या संस्थेच्या ईतिहासात प्रथमच २०२४ ते २०२७ च्या कालावधीसाठीच्या अध्यक्ष व कार्यकारी मंडळाची निवडणूक यबिनविरोधल पार पडल्याचे संस्थेचे निवडणूक अधिकारी ॲड. राजेश मुधोळकर यांनी त्यांच्या अहवालामार्फत कळविले आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारी मंडळाची नेमणुकीची अधिकृत घोषणा ११ ऑगस्ट २०२४ रोजी संपन्न होत असलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपल्या घटनेनुसार करण्यात येईल व नवीन कार्यकारीणीचा व अध्यक्षांचा कार्यकाळ ११.०८.२०२४ ते १०.०८.२०२७ असा राहील.

नवनिर्वाचित अध्यक्ष व सर्व कार्यकारी मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन आणि त्यांच्या व संस्थेच्या भावी यशासाठी मनापासून शुभेच्छा.

विशेषकरून नमूद करावेसे वाटते की, ज्या सभासदांनी या निवडणूकीत सहकार्य केले व विशेषतः निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी स्वतःचे वैयक्तिक हित न पाहता संस्थेच्या हितासाठी माघार घेऊन सहकार्य केले त्याची नोंद संस्थेच्या इतिहासात निश्चितच नोंदली जाईल. त्यांचा हा त्याग भावी पिढीसाठी आदर्श ठरावा व सामाजिक संस्थामधे कार्य करणाऱ्या व्यक्तिसाठी आदर्श ठरावा ही माझी प्रभू रामचरणी प्रार्थना. येणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्यांच्या या निष्ठेची आणि सेवेची निश्चितच नोंद घेतली जावी ही विनंती.

## टी ट्वेंटीमध्ये भारत जगज्जेता

नुकत्याच अमेरिका व वेस्टइंडीजमध्ये पार पडलेल्या टी ट्वेंटी विश्वचषकामध्ये भारत विजयी ठरला आहे आणि वर्ल्डकप १३ वर्षानंतर भारतात आणण्यास रोहित शर्मा व त्याचे सहकारी यांनी ही कामगिरी केली आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. या सर्वांनी सगळ्यांपुढे आदर्श ठेवला आहे की, जर प्रत्येक सहकाऱ्याने / खेळाडूने त्याची कामगिरी चोख बजावली तर आपण कोणालाही हरवू शकतो व जगज्जेते बनू शकतो. क्रिकेटचा या अद्वितीय पराक्रमाबद्दल सर्व भारतीयांची मान जगात उंचावली आहे.

चला आपण सर्व रोहित शर्मा आणि त्यांच्या सर्व सहकारी क्रिकेट वीरांचे मनापासून अभिनंदन करुया. विशेषतः नमूद करावेसे वाटते की, संघाचे व्यवस्थापक श्री. राहुल द्रविड हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून लवकरच आम्ही त्यांच्याशी संपर्क साधून त्यांचा यथोचित गौरव करणार आहोत.

आपले सहकार्य व आशिर्वाद असेच राहू दे.

**प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**मिलिंद सरदेशमुख**
संपादक

# नुपेक्षी कदा रामदासाभिमानी (भाग २)

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

**पदी राघवाचे सदा ब्रीद गाजे। वळें भक्तरीपूशिरी कांबि वाजे।।**
**पुरी वाहिली सर्व जेणे विमानीं। नुपेक्षी कदा रामदासाभिमानी।।२९।।**

'राघवाचे ब्रीद असे आहे की तो आपल्या भक्ताच्या शत्रूला शिक्षा करण्यासाठी ताकद वापरण्यात हयगय करीत नाही. हे त्याचे ब्रीद पदोपदी सतत समजून येते. त्याचप्रमाणे आपल्या भक्तांच्या सुखाकडे देखील त्याचे पूर्ण लक्ष असते. हे देखील त्याने लंकेतून अयोध्येला परतताना सारी वानरसेना आपल्या पुष्पक विमानातून नेली होती. यावरुन दिसून येतेच. असा हा राम आपल्या दासांविषयी अभिमान बाळगतो आणि कोणाची उपेक्षा करत नाही.'

आपल्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचा निर्णय घेताना प्रत्येक पावलावर श्रीरामाचे स्मरण आपण केले पाहिजे. श्रीरामाचे स्मरण म्हणजे काय? आपल्या अंतःकरणातील जे रामतत्व आहे, तोच आपला विवेक आहे. तीच आपली सद्सदविवेकबुद्धी आहे. सत्य म्हणजे रामतत्व. त्यास स्मरुण जर एखाद्याने कार्य सुरु केले तर त्या कामात अपयश कधीच येत नाही. उलट जसे तसे ते काम पुढे पुढे सरकते तसा तसा त्यात रामाच्या तत्वाचा प्रत्यय येऊ लागतो. विचार करा जर फक्त रामतत्वाच्या साक्षीने जर एखादे कार्य इतक्या उंचीवर जात असेल तर प्रत्यक्ष प्रभू श्रीराम सोबत असतील तर काय होईल?

रामराज्यात अयोध्यावासी हे साक्षात श्रीरामांच्या नगरीत राहत होते. त्या सर्वांचा उद्धार प्रभू श्रीरामचंद्रांनी केला. आपल्या भक्तांच्या रक्षणासाठी श्रीरामांनी नेहमीच आपला धनुष्य उचलला आहे. श्रीरामरायांच्या भक्तांचे जे कोणी शतू होते ते नेहमी रामरायांकडून दंडित झाले. रामाने नेहमी अशा शतूंच्या मस्तकावर प्रहार केला आहे. आपल्या पाठिशी साक्षात राम आहे ही भावनाच इतकी सकारात्मक आहे की यामुळे अनेक कठीण आणि अशक्यप्राय वाटणारी कार्य पार पडतात. जगातील सज्जन लोकांना एक पाठबळ मिळाले तर ते अनेक सृजनात्मक गोष्टी करु शकतात. त्यामुळे समाजाच्या उत्थानाचे कार्य होऊ शकते. अशा लोकांच्या मनातील रामतत्व हे कार्यरत होते तेव्हा साक्षात श्रीरामच अनेक कार्ये घडवून आणत असतात. अशाप्रकारे श्रीरामाच्या भक्तांनी हे सदैव ध्यानी असू द्यावे की जर आपण प्रत्येक पावलावर श्रीरामाला आठवून कार्य केले तर. ते रामतत्व आपल्या मागे ऊभे राहते आपल्याला सन्मार्ग दाखवते आणि अशा पाठिंब्यावर आपल्याकडून अनेक चांगल्या गोष्टी पूर्णत्वास जातात. या कार्यात अडथळा आणणाऱ्या लोकांना प्रभू श्रीराम दंडित करतात व आपल्या भक्तांचे रक्षण करतात. त्यांना कुठलेही दुःख ते होऊ देत नाहीत.

## वाचकाचा अभिप्राय

मे महिन्याचा समाचारचा अंक मिळाला. एकंदर अंकाची रचना सुंदर आहे. त्यातल्या त्यात डॉ. रश्मी फडणवीस यांचा 'आरोग्य स्त्री जीवनाचे' हा लेख सर्व महिलांसाठी अतिशय उपयुक्त आहे. तरी समस्त महिलांनी आपल्या मित्र-मैत्रणींना अवश्य वाचण्यास सांगावे.

**– अनिरुद्ध देशपांडे**

# संलग्न संस्था वृत्त

**अकोला :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ अकोला तर्फे सर्वशाखीय ब्राह्मण गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय सभागृहात दिनांक ७ जुलै २०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता संपन्न झाला. या गौरव सोहळ्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. व्ही. एल. देशपांडे तर प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ. सौ. वसुधा विनोद देव या उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलाने व सरस्वती पूजन करून करण्यात आली. मान्यवर पाहुण्यांच्या सत्कारानंतर मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहसचिव जयंत सरदेशपांडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. श्रद्धा संत यांनी केला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना भरपूर मेहनत करून यश कसे मिळवायचे याबद्दल मार्गदर्शन केले. एकूण १३० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव भेटवस्तू व बक्षिस व पुरस्कृत रोख रक्कम देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप वांगीकर, सौ. मंजुषा घोटीकर, सौ. मृणाल कुलकर्णी तर आभार प्रदर्शन संजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे सचिव श्री. अनय घोटीकर, संजय देशमुख, दिनेश देशपांडे, जयंत वांगीकर, मृणाल कुलकर्णी, श्रद्धा संत, सीमा सरदेशपांडे, मेघा देशमुख, अवंतिका मायराळ आदि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप सौ. अवंतिका मायराळे यांच्या हस्ते झाला.

**छत्रपती संभाजी नगर :** ब्राह्मण समाजाबद्दल अन्य समाजाच्या मनात गैरसमज निर्माण केला जात आहे. मनुसमृती वरुन ब्राह्मण समाजाला वारंवार लक्ष्य केलं जाणं, ब्राह्मणांवर टिका केली जाणं आजकाल उघडपणे होत आहे. आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी विनाकारण ऊठसुठ ब्राह्मणावर दोष दिला जातो. हे थांबविले पाहिजे. मनुस्मृती फाडली, जाळली जाते. मात्र हे केल्याने काय फरक पडणार आहे? मनुस्मृतीचा आताच्या ब्राह्मणांशी काय संबंध, ती जेव्हा लिहिली गेली तेव्हा केवळ एकट्याच ब्राह्मणांनी ती लिहिलेली नाही. जे जे मनु होऊन गेले ते सर्व ब्राह्मणच होते, त्यावर विश्वास असण्याचे कारण नाही. शेवटी त्या मधील जे काही चांगलं आहे ते आपण घेतलं पाहिजे आणि वाईटावर सर्वांनी मिळून टीका केली पाहिजे असे मत खासदार मेघा कुलकर्णी यांनी मांडले. छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या ब्राह्मण अधिवेशनात त्या बोलत होत्या. छत्रपती संभाजी नगरातील तापडिया नाट्यमंदिर येथे हे अधिवेशन नुकतेच पार पडले. राज्यभरातून मोठ्या संख्येने ब्रह्मवृंद उपस्थित होते. ब्राह्मण समाजावरील विविध मुद्यावरुन राजकीय पोळी भाजण्याच्या हेतूने होणाऱ्या टीकेला सडेतोड प्रत्युतर तर त्यांनी दिलेच, त्या म्हणाल्या, महात्मा गांधीची हत्या नथुराम गोडसे यांनी केली, आता हत्या करणारा एक ब्राह्मण होता म्हणून सर्व समाज दोषी का? परंतु या घटनेनंतर संपुर्ण ब्राह्मण समाजावर राग काढण्यात आला. अजूनही विरोधी राजकारणी त्यांच्या स्वार्थसाठी समाजात द्वेष भावना निर्माण करून टीका करत आहेत ती किती दिवस सहन करायचे हे थांबायलाच हवे. शेंडी जानव्याचे असे कोणते वेगळे हिंदुत्व नाही. हिंदू धर्मात असे समाज पंथ आहेत. ज्यात विधि संस्कार, म्हणून शेंडी ठेवली जाते आणि जानवे घातले जाते. केवळ एकटा ब्राह्मण समाजच नाही. मात्र समाजात द्वेष निर्माण करणाऱ्या अशा राजकारणी मनोवृत्तीला कायम मिटवलेच पाहिजे असे खासदार मेघा कुलकर्णी म्हणाल्या. हिंदू धर्मात सर्वच जाती पंथांचा समावेश होतो. आपण सर्वजण आदि हिंदू आणि नंतर ब्राह्मण, मराठा व विविध जाती पंथातील आहोत हे लक्षात घ्यावे आणि हिंदू धर्म रक्षणासाठी सर्वांनी एकत्रित यावे असे उपस्थितांना आवाहन केले.

**कल्याण :** त्रिविक्रम मंदीर देवस्थान, पारनाका येथे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण आयोजित

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्मरणार्थ एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात यअनादी मी अनंत मी अवध्य मी भलाल या कवितेने ॲड्. शिवानी कांबळे हिने गाऊन केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री. चिन्मय घनश्याम आमटे आणि जेष्ठ श्री. प्रविण देशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर आणि कार्यावरची सखोल माहिती देण्यात आली. चिन्मय घनश्याम आमटे आणि प्रविण देशमुख यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या राष्ट्रकार्यावर व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला सुमारे १०० ते १५० लोक उपस्थित होते. हा विशेष कार्यक्रम सौ. शुभांगी कुलकर्णी यांच्या सूत्रसंचालनाने आणि मुग्धा घाटे यांच्या आभार प्रदर्शनाने संपन्न झाला.

✲ ब्राह्मण महासंघ डोंबिवली आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने त्रिदिवशीय आध्यामिक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. या तिनही दिवसासाठी अर्थतज्ञ, लेखक व व्याख्याते श्री. चंद्रशेखर टिळक हे उपस्थित होते. दिनांक ०७, ०८, ०९ जून २०२४ या तिनही दिवशी त्यांनी वेगवेगळे विषय हाताळले. पहिल्या दिवशी दे.ऋ.ब्रा. कल्याणच्या जेष्ठ सदस्य श्री. वसंतराव पुरोहित यांनी शिक्षण महर्षी, राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्कार तसेच त्यांच्या सौ. वृंदाताई पुरोहित यांना वेदउपासक तसेच वेद अभ्यासासाठी डॉक्टरेट, महाराष्ट्र राज्य वैदिक परिषदेवर अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल उभयतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कल्याण शाखेचे दोन मान्यवर सदस्य मनोज पळसोदकर यांना रसायन शास्त्र या विषयातील प्रबंधाबद्दल डॉक्टरेट तसेच श्री. अमित देशमुख यांना आध्यामिक ज्योतिष विषयक तसेच कृष्णविषयावरील प्रबंधास डॉक्टरेट मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष मानस पिंगळे, देऋब्रा कल्याण संस्थेचे अध्यक्ष सुरेशराव कुलकर्णी, कोषाध्यक्ष दिपक देशपांडे, अथर्व जोशी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता आपटे, मुग्धा घाटे, शंतनु पुराणिक यांनी केले. आभार प्रदर्शन ॲड्. मंदार कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास शुभांगी कुलकर्णी, शंतनु पुराणिक, विजय चाव्हरे, मुग्धा घाटे, प्रमोद सांगली, जितेंद्र कांबळे तसेच कल्याण, डोंबिवलीकर मधील रसिक प्रेक्षकांनी कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

**अभिनंदन** : कल्याण संस्थेच्या माजी अध्यक्षा, जेष्ठ सदस्या श्रीमती माधवी मधुकर देशपांडे यांचा नातू व कल्याणचा युवा खेळाडू श्री. तुषार उदय देशपांडे याची झिम्बांबे येथे दोऱ्यावर जाणाऱ्या आगामी भारतीय क्रिकेट संघात तेज गोलंदाज म्हणून निवड झाली आहे. तुषार व समस्त देशपांडे परिवाराचे देऋब्रा संघातर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दीक शुभेच्छा.

**सोलापूर** : दिनांक २४ मे रोजी दयानन महाविद्यालयाचा संस्कृत विभाग आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूर या दोन संस्थामध्ये संस्कृत संभाषण लेखन प्रशिक्षण वर्ग घेण्याबाबत सामंजस करार करण्यात आला. संस्कृत विभाग प्रमुख डॉ. रेवा कुलकर्णी यांनी सामंजस्य कराराची प्राथमिक प्रत देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्याकडे सुपुर्त केली. यावेळी संस्थेच उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, कोषाध्यक्ष सतिश पाटील, सहकार्यवाह विजय कुलकर्णी उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांचा डॉ. रेवा कुलकर्णी यांनी बुके देऊन सन्मान केला. या निमित्ताने आपली संस्था देशातील मोठ्या शिक्षण संस्थेशी जोडली गेली आहे याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे.

**अभिनंदन** : देशस्थ ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, सोलापूर या संस्थेचे कार्यकारिणी सदस्य श्री. रंगनाथ जोशी यांची डॉ. हेगडेवार बल्ड बँक सोलापूर येथे व्यवस्थापक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. नुकताच त्यांनी पदभार घेतला असून कामकाजास सुरुवात केली आहे. त्यांच्या या सामाजिक कार्यास हार्दीक शुभेच्छा.

**विद्यार्थी गुणगौरव** : यश मिळविण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांनाही मेहनत घ्यावी लागते. कोणतेही क्षेत्र

उत्तम असते. यशाला शॉर्टकट नसतो. म्हणूनच मोबाईल व इंटरनरेट हे माहितीचे साधन असले तरी ज्ञानाचे स्तोत्र असू शकत नाही. त्यासाठी मोबाईलचा वापर विवेकाने करावा असे प्रतिपादन सोलापूर महानगर पालिकेच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी केले. संस्थेतर्फे इयत्ता १ ली ते पी.एच.डी. विद्यार्थी–विद्यार्थीनींना रु. ७०,०००/– अर्थसहाय्य आणि शालेय साहित्याचे वितरण आणि १०वी, १२ वी गुणवंतांचा सत्कार कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर होते. व्यासपिठावर दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, सहकार्यवाह डॉ. न. भा. काकडे, कार्यवाह शाम जोशी उपस्थित होते. संस्थेच्या रामदास संकुलातील समर्थ सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

**पुणे** : ६ जुलै – अमृत संस्थेच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण व अमृतच्या विविध योजनांचे सादरीकरण – महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या विविध योजनांच्या माहिती पुस्तिकेचे अनावरण दि. ६ जुलै २०२४ रोजी महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे येथे संपन्न झाले. यावेळी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील युवक युवती व इतर उमेदवारासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम राबविण्यात येऊन व इतर माध्यमातून विद्यार्थी युवक युवती इत्यादींचा विकास घडविण्यासाठी अमृत या नावाने स्वायत्त संस्था स्थापन करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था, मंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील युवक युवती व इतर उमेदवार योजनेचा अमृत या संस्थेचा लाभ घेऊ शकतात. अमृतचे मुख्य कार्यालय महाराजा सहाजीराव गायकवाड उद्योग भवन, ५ वा मजला, औंध, पुणे ४११००७ येथे आहे. जिल्हा व विभाग कार्यालय सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे. कार्यालय सुरु झाल्यावर त्याबाबतची सविस्तर माहिती अमृतच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध केली जाईल. असे श्री. विजय जोशी व्यवस्थापक संचालक अमृत यांनी या प्रसंगी सांगितले. MPSC आणि UPSC स्पर्धा परिक्षांसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य तसेच AIIMS, IIT, IIM, IIIT या संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य व शैक्षणिक योजनेचा समावेश आहे. गृहउद्योग आणि लघुउद्योग या क्षेत्रामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा यासाठी तसेच कृषिउत्पन्न आधारित उत्पनासाठी प्रोत्साहन देणे व त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे व या योगे सुमारे १०००० उमेदवारांना स्वयंपूर्ण बनविण्याचा संकल्प आहे.

महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेसोबत अमृत संस्थेने करार केला असून संगणक टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजना सुद्धा एक आकर्षक योजना आहे. कृषि क्षेत्रात द्रोण वापरण्याचे प्रशिक्षण योजना, महाराष्ट्राती खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना उद्योगाभिमुख व रोजगारक्षम प्रशिक्षण देणे, माहिती तंत्रज्ञान, उच्च कार्यक्षमता संगणक ग्रीड आणि क्लाऊड संगणक बहुभाषिक संगणक, व्यावसायिक इलेक्ट्रानिक्स, स्फॉटवेअर तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, सर्वव्यापी संगणक प्रशिक्षणाद्वारे उद्योग व उद्योगाभिमुख रोजगार व स्वयंरोजगार निर्मिती करणारे प्रशिक्षण C-DAC माध्यमातून देणे, नवउद्योजक व नवव्यवसाय उभारणीस प्रेरणा देणे व मार्गदर्शन करणे अशा प्रकारच्या अनेक योजना याप्रसंगी सादर करण्यात आल्या. तसेच आर्थिक सहाय्यासाठी अमृत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना त्याचप्रमाणे परशुराम गट कर्ज व्याज परतावा योजना आदिंची माहिती याप्रसंगी देण्यात आली. या संदर्भातल्या सविस्तर माहितीसाठी इच्छुकांनी अमृत संस्थेच्या वेबसाईटवर भेट देऊन आवश्यक ती माहिती घेण्याचे आवाहन करण्यात आले. संस्थेचे वेबसाईट – www.mahaamrut.org.in तसेच ई–मेल info@mahaamrut.org.in दूरध्वनी क्रमांक ९७३०१५१४५०,

०२०-०२९९९९०९६. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी संपर्क साधावा असे रामदादा लोकरे यांनी योजना समजावताना सांगितले. या प्रकाशन सोहळ्यास सर्वश्री विनोद देशपांडे, प्रभाकर कुलकर्णी, मिलिंद सरदेशमुख, बडोद्याचे नितिन शहापुरकर, डॉ. सचिन बोधनी आम्ही सारे ब्राह्मण आणि ब्राह्मण व्यवसायिक पत्रिकेचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, चित्रपट अभिनेते योगेश सोमण, डॉ. संजिवनी पांडे, विश्वजित देशपांडे, डॉ. प्रिया देशपांडे आदि समाजातील विविध संस्थांचे ५३ मान्यवर व पत्रकार उपस्थित होते.

**मुंबई** : दादर सांस्कृतिक मंच व अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने यजोडी तुझी माझी : कलावंत जोडप्याची कलात्मक कहाणील या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १५ जून २०२४ रोजी संस्थेच्या लक्ष्मीनारायण सभागृहात आयोजित करण्यात आले होते. प्रसिद्ध अभिनेते सीमा व श्रीरंग देशमुख, मधुरा व अभिजित साटम, अक्षता व विक्रम गायकवाड या चित्रपटातील कलाकारांचा जोडीने सहभाग होता. अत्यंत खुमासदार पद्धतीने या जोडप्यांनी आपल्या लग्नाविषयीचे अनुभव कथन केले. या कार्यक्रमाची मुलाखत व सूत्रसंचालन सौ. उत्तरा मोने यांनी केले. दादर मधील १० जेष्ठ जोडप्यांचा (लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाली) मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दादर, माहीम, माटुंगा परिसरातील सुमारे १५० रसिक प्रेषक या कार्यक्रमास उपस्थित होते. मध्यवर्ती संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी व श्री. मिलिंद सरदेशमुख हे ही या कार्यक्रमास उपस्थित होते.

**व्यासपीठ** : मुंबई विभागातील सर्व ब्राह्मण समाजातील बांधवांना-भगिनींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी व समाजासमोरील आव्हानांना सकारात्मक तोंड देण्यासाठी यमहाराष्ट्र ब्राह्मण सभाल सक्षम फळीसह मुंबईत उभी राहिली आहे. दिनांक १९ जून २०२४ रोजी दादर मुंबई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मुंबई व उपनगरातील बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते. ब्राह्मण समाजाच्या मूळ उद्दीष्टांसह नवीन समाजोपयोगी व समाज हितांच्या योजनांचा विचार याठिकाणी उपस्थितांनी मांडला. कोणत्याही राजकीय पक्षाचा विचार महाराष्ट्र ब्राह्मण सभेने करु नये, कोणत्याही राजकीय पक्षांच्या वळचणीला ब्राह्मण समाजाने जाऊ नये असाही विचार बहुतेकांनी या सभेत मांडला. ज्ञातीच्या व समाज हितासाठी मुंबईत महाराष्ट्र ब्राह्मण सभा यापुढे कार्य करेल असे ठरले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासारख्या प्रखर राष्ट्राभिमानी व्यक्तिमत्वाकडून प्रेरणा घेऊन १९२६ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र ब्राह्मण सभेचे अधिवेशन लवकरच मुंबईत व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. या सभेत सर्वश्री डॉ. सचिन बोधनी, सदानंद पावगी, श्रीम. शुभांगी जोशी, प्रभाकर कुलकर्णी, रविंद्र आवटी, मिलिंद सरदेशमुख, आनंद कुलकर्णी हे ही उपस्थित होते. श्री. रविंद्र आवटी यांची मुंबई प्रदेश अध्यक्षपदी व श्रीम. शुभांगी जोशी यांची मुंबई प्रदेश महिला आघाडी अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

**जागेचा ताबा** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या मालकीच्या ताब्यातील ईमारत भाडेकरुंविरुद्ध लघुवाद न्यायालयात केस चालू होती. त्यापैकी श्री. सुखानंद डिके, रुम नं. २२, तिसरा मजला या जागेचा निकाल माननीय न्यायालयानी मंडळाच्या बाजूने दिला. सदर भाडेकरु श्री. सुखानंद डिके यांनी दिनांक २७.०६.२०२४ रोजी जागा मंडळाच्या ताब्यात दिली. सदर जागेचा ताबा मंडळाचे अध्यक्ष विलास जोशी, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी व श्री. मिलिंद सरदेशमुख यांच्या उपस्थितीत मंडळाने घेतला. कै. ॲड. माधवराव अनगळ व कै. प्रभाकर संत यांचे भाडेकरुविरुद्ध घेतलेले निर्णय यशस्वी होत आहेत या दोघांना विनम्रपणे अभिवादन. ॲड्. श्री. आनंद नायक यांचे प्रयत्न खूपच महत्त्वाचे आहेत. ॲड्. नायक यांचे आम्ही आभारी आहोत. तसेच संस्थेचे व्यवस्थापक श्री. विकास माने यांची बहुमुल्य मदत याबद्दल संस्थेच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

**विद्यार्थी गुणगौरव सोहळा** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ १० वी १२ वी व पदवी परिक्षेत विशेष नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा दि. २९.०६.२०२४ रोजी संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. विलास जोशी, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी तसेच प्रमुख पाहुणे अनिरुद्ध छावजी, अरविंद कुलकर्णी, जयेंद्र साळगावकर, श्रीराम कुलकर्णी, डॉ. नामजोशी, प्राचार्य सतिश ईनामदार, अ‍ॅड. आनंद नायक आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अरुणा आग्नहोत्री व श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी केले. या गौरव सोहळ्यात मुंबईतील बालमोहन विद्यामंदिर, साने गुरुजी शाळा, राजा शिवाजी विद्यालय, सरस्वती विद्यामंदीर, आय.ई.एस. मॉडर्न इंग्लिश स्कूल, पिपल्स एज्युकेशन स्कूल सेकेंडरी सेक्सन, छबिलदास हायस्कूल, डी. जी. रुपारेल महाविद्यालय, किर्ती एम. डुंगरशी महाविद्यालय, छबिलदास ज्युनिअर कॉलेज मधील प्रथम तीन क्रमाकांच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींचा तसेच ज्ञातीतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. डोंबिवली, मुलुंड, ठाणे, कल्याण इ. संलग्न संस्थाचे कार्यकर्ते, पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

**मुलुंड** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड तर्फे शनिवार दि. २९.०६.२०२४ रोजी विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुलुंडमधील शाळा महाविद्यालयातून दहावी, बारावीतून प्रथम क्रमाकांने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनीचे कौतुक सन्मानपत्र, रोख रक्कम व गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सौ. प्रतिमा जोशी यांनी सर्वांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविकामध्ये संस्थेची स्थापना कधी झाली, संस्थेची उद्दीष्टे काय आहे हे सर्वांना सांगितले. सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन संस्था करीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सौ. रेणुका कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्या डॉ. मिनल मोकाशी यांचा परिचय करून दिला. महिला शाखा अध्यक्षा डॉ. प्रेरणा क्षिरसागर यांचा सन्मान करण्यात आला. डॉ. मिनल मोकाशी यांनी मुलांना अतिशय उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. काही पालक व विद्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्था करीत असलेल्या कामाचे कौतुक व संस्थेच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. विश्वस्त प्रमुख श्री. विजय वडगबाळकर, कार्याध्यक्ष भगवान आडगावकर यांनी देखील मुलांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. वंदे मातरम ने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यकारणीच्या सर्व सदस्यांच्या एकजुटीने कार्यक्रम सुरेख झाला.

**कोथरुड** : दिनांक १ जुलै २०२४ रोजी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आणि श्री तुकाराम महाराज यांच्या पालखीसोबत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कोथरुड, कर्वेनगर पुणे शाखेतर्फे आयोजित करण्यात आले. दिंडीतील सर्व वारकऱ्यांना याप्रसंगी अल्पोपहार देण्यात आला. वारकरी संप्रदायातील जेष्ठ श्री. अण्णा पाटील सांगलीवाडी दिंडी प्रमुख यांच्या सहकाऱ्यांनी आरोग्य शिबिरात २०० पेक्षा जास्त वारकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या आरोग्य शिबिरास देशस्थ ऋग्वेदी शिबिर कोथरुड शाखेचे अध्यक्ष डॉ. अरुण हुपरीकर, सौ. केतकी कुलकर्णी, सौ. साधना ओढेकर, सौ. जयश्री घाटे तसेच सौ. स्मिता इनामदार उपस्थित होत्या. डोकेदुखी, पाय दुखणे, सर्दी, खोकला, ताप या सर्व आजारावर औषध गोळ्या तसेच मलम ट्यूब मोफत देण्यात आले. डॉ. हुपरीकर यांनी आपल्या खड्या आवाजात पांडुरंगाची दोन भजने सादर करून वातावरण निर्मिती केली. जयहरी विठ्ठल असा नामघोष करत आलेल्या सर्व वारकरी माऊलींची सेवा करण्याचे भाग्य मिळाल्याचा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

**✻ गुरुपौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! ✻**

# आरोग्य स्त्री जीवनाचे : स्तनाचे रोग

**डॉ. रश्मी फडणवीस** (स्त्रीरोग तज्ज्ञ, मो. ९८२०२८२१३०)

संगणक युगातील तरुण तरुणींना विज्ञानाकडे पहाण्याची वेगळीच दृष्टी आली आहे. त्याचा उपयोग त्यांनी आपल्या आरोग्यासाठी करून घेणे आवश्यकच आहे. पौगंडाव्यवस्थेतील एखादी मुलगी जेव्हा स्त्रीरोगतज्ञाकडे जाते तेव्हा तिला जाणून घ्यायचे असते की आपल्या दोन्ही स्तनांचा आकार वेगवेगळा कां? तसेच काहीजणींना काखेत काहीतरी गाठ आल्याचे समजते. मासिक पाळीच्या दरम्यान ती कमी-जास्त होत असल्याचे आढळते. जेव्हा स्तनांना हातळतांना हातास एखादी गाठ लागते तेव्हा मनात सर्वप्रथम कर्करोग असेल का? असाच प्रश्न उभा राहतो. तसेच हल्ली सर्वांच्या कामाच्या ठिकाणी एक संपूर्ण आरोग्यदायी तपासणी यात यमॅमोग्राफील ही तपासणी स्त्रियांसाठी असते. तेव्हा त्याचा उपयोग आपण कसा करून घ्यावयाचा ते कळण्यास हवे.

स्तनांच्या इतर आजारांबरोबर सर्वात महत्त्वाचा आहे तो स्तनांचा कर्करोग. हा कर्करोगाच्या संज्ञेत दुसऱ्या क्रमांकावर आहे. स्तनांचे आजार वा काहीतरी वेगळेपणा हा वयाच्या कोणत्याही वर्षी जाणवू शकतो. परंतु वयाच्या ३५-४० वर्षापासून ५६-७० वर्षापर्यंतचा काळ महत्त्वाचा आहे. स्तनाचा कर्करोग याची संभावना कुणास होऊ शकते हे जाणून घेतल्यास आपणांस लवकर निदान व उपचार करून घेता येतात.

ही संभावना कुणास अधिक होऊ शकते?

* अनुवंशिकतेनुसार आईला कर्करोग (स्तनाचा) झाला असेल तर मुलीला ५ ते १० टक्के होण्याची संभावना असते कारण जनुकतेतील बदल हा लवकर जाणवू शकतो.

* जर एखाद्या स्त्रीस एका स्तनास कर्करोग होऊन उपचार केले असतील तर दुसऱ्या स्तनास त्याचा प्रार्दुभाव काही वर्षांनी जाणवू शकतो.

* ज्या स्त्रियांना वयाच्या १२व्या वर्षाआधी मासिकपाळी सुरु होते वा ज्या स्त्रियांना रजोनिवृत्ती (मासिक माळी बंद होणे) वयाच्या ५५व्या वर्षापर्यंत होते. तसेच ज्या स्त्रियांना एकही मूल झाले नाही अशा सर्व प्रकारच्या स्त्रियांमध्ये स्तनाचा कर्करोग होण्याची संभावना असते.

* विशेष नमूद करण्याचा मुद्दा असा की ज्या स्त्रिया आपल्या मुलांना ६ महिने ते दोन वर्षापर्यंत स्तनपान करतात त्यांना स्तनाचा कर्करोग उद्भवू शकत नाही.

* ज्या स्त्रियांनी काही कारणास्तव दोन्ही अंडकोश काढून टाकले असतील तर त्यांना स्तनाचा कर्करोग होण्याची शक्यता कमी असते.

* ज्या स्त्रिया रजोनिवृत्तीच्या काळात हार्मोन्स-रिप्लेसमेंट थेरपी घेतात व १० वर्षांच्या कालावधीपर्यंत घेत असल्यास त्यांना कर्करोग होण्याची संभावना नाकारता येत नाही.

* ज्या स्त्रियांनी काही कर्करोगांवरील उपचार म्हणून खूप कालावधीपर्यंत क्ष-किरण घेतले असतील अशा स्त्रियांनाही स्तनाचा कर्करोग होऊ शकतो.

* श्वेतरंगाच्या (व्हाईट) स्त्रियांना स्तनरोगाची शक्यता अधिक असते.

* मादक द्रव्ये सेवन, पाश्चिमात्य आहारपद्धती यांचा विचार स्तनाच्या कर्करोगासंबधित करण्यास हवा.

स्तनाच्या कर्करोगासंबधित जेव्हा जेव्हा तपासण्या होतात तेव्हा वरील कारणांकडे लक्ष जरूर देण्यास हवे. तसेच मॅमोग्राफी झाल्यानंतर स्तनांची तपासणी कशी करावी हे ही महत्त्वाचे आहे.

१. उभे राहून कमरेवर हात ठेवून

२. हात वर करून

३. काखेतील गाठीसुध्दा महत्त्वाच्या आहेत – ती तपासणी महत्त्वाची ठरते.

४. बिछान्यावर झोपून – हाताच्या बोटाने, तळहाताने पहाणे जरूरीचे आहे.

५. स्तनाग्रातून येणारा चिकट द्रव पदार्थ पहाणंही महत्त्वाचं ठरतं.

या गोष्टी लिहून ठेवणे जरूरीचे आहे. स्त्री रुग्णाने तसेच तपासणी करणाऱ्या डॉक्टरनेही नोंद करून ठेवावी. डॉक्टरांच्या दृष्टीने खालील गोष्टी महत्त्वाच्या ठरतातः १) मॅमोग्राफी कधी केली होती व त्याची नोंद – त्यातील तपासानुसार २) रुग्णाशी केलेला संवाद, ३) तपासणीची नोंद, ४) पुढील तपासासाठी कधी सांगितले आहे.

मॅमोग्राफी – ही तपासणी सर्व ठिकाणी चर्चिली जाते. त्याबद्दल आपण जागरुक असणं महत्त्वाचं आहे. ही स्तनाच्या कर्करोगासंबधित वा इतर आजारासंबंधित केली जाते. यात मशीनद्वारे स्तनांवर दाब देऊन आलेख काढून छायाचित्रे घेतली जातात. ज्यांच्या स्तनांचा आकार अधिक आहे त्यांच्याबाबतीत ही तपासणी करून निष्कर्षापर्यंत येणे कठीण असते. मॅमोग्राफी तपासणी नंतर काढल्या गेलेल्या निष्कर्षात १०–१५ टक्के चूक होऊ शकते. म्हणूनच मॅमोग्राफी व स्तनांची तपासणी यांची जोड असावी. साधारण वयाच्या ४०व्या वर्षापासून ६५–७० वर्षापर्यंत ही करून घ्यावी. ४० व्या वर्षाच्या तपासणीत काही आढळले नाही तर २ वर्षानंतर तपासणी करून घ्यावी. या मॅमोग्राफीचा निष्कर्ष आपल्याला BI-RADS (बी.आय.आर.ए.डी.एस.) असं वर्गीकरण होतं. यात चार प्रकार येतात.

१) ज्यात – स्तनाच्या तपासणीत सर्व काही योग्य आहे.

२) दुसरा प्रकार म्हणजे थोडेसे बदल असल्यास कर्करोग नक्कीच नाही, स्तनातील इतर गाठींची पण त्याची नोंद ठेवून परत तपासणी आवश्यक.

३) स्तनातील गाठींचा तुकडा तपासणीसाठी आवश्यक व अतिदक्षतेने उपचार करावा अशी नोंद दिली जाते.

४) स्तनाच्या गाठींमध्ये कर्करोग आहे त्याचा इलाज लवकरात लवकर करावा.

५) स्तनाच्या गाठीतील कर्करोगाचे निदान आधीच असले तरी त्याचा प्रार्दुभाव अधिक होऊ नये म्हणून त्वरीत उपचार करावेत.

स्तन तपासणीत – स्तनाग्रांचा आकार, त्यांचा दर्शनी भाग, त्यातून येणारा द्रवपदार्थ हा कोणत्या रंगाचा आहे, किती प्रमाणात आहे त्याचबरोबर आजूबाजूची त्वचा कशी आहे, काखेत गाठी असल्यास त्यांची तपासणी या सर्व गोष्टी समाविष्ट आहेत. मॅमोग्राफीप्रमाणेच मॅमोसोनोग्राफी व एम.आर.आय. ह्या तपासणीतून अधिक माहिती मिळते.

अल्ट्रासोनोग्राफीच्या मदतीने घेतलेली फाईन नीडल बायोप्सी ही निदानासाठी उपयुक्त ठरते. एखाद्या बारीक तुकड्यावरुन सर्वसाधारण निदान होते. स्टिरिओस्टॅटिक बायोप्सी ही जेव्हा हातास गाठ लागत नाही परंतु स्तनाच्या मॅमोग्राफीमध्ये काहीतरी संशयास्पद आहे असे समजल्यास केली जाते.

स्तनाच्या कर्करोगाच्या निदानाव्यतिरिक्त स्तनाचे रोग खालीलप्रमाणे नमूद केले जातात.

* स्तनाच्या वाढीतील पाण्यासारख्या गाठी (Fibrocystic disease)
* स्तनाच्या आत झालेली मांसल वाढ (Fibroadenoma)
* स्तनाच्या पेशीतील बदल (Mastitis)
* स्तनाग्रापर्यंत येणाऱ्या नलिकासंदर्भात (Duct-ectasia)

* स्तनावरील रक्तवाहिन्यांचा दाह (Superficial Thrombophiebitis)
* स्तनाच्या पेशीतील बिघाड (Fat Necrosis)
* स्तनाग्रातून बाहेर पाझरणारा द्रव (Nipple discharge) याचा रंग, प्रवाहीपण, दृश्यस्वरुप महत्त्वाचे ठरते.
* स्तनातील गाठी (Galatocele) या गाठीसाठी एक द्रव्य घालून आलेख काढला जातो ह्याला Galacrography म्हणतात.

एकंदरीत स्तनातील प्रत्येक गाठ ही कर्करोगाची नसते, तसेच स्तनाग्रापासून येणारा द्रव हा केवळ संप्रेरकांच्या असंतुलनामुळेच नसतो तर तो ज्या नलिकेतून येत असतो तिथे कर्करोगाची संभावना झालेली असू शकते म्हणून श्ग्म्द्ल्म्ूत ण्म्हदस् याकडे दुर्लक्षित लक्षणांमुळे होणाऱ्या स्थितीमुळे लक्ष देणे आवश्यक आहे. स्त्रीरोगतज्ञ व शल्यविशारदतज्ञ यांच्याकडे जाऊन त्वरीत निदान व उपचार करून घ्यावेत. स्तनाच्या कर्करोगाची मीमांसा पुढील भागात होईल. सद्यपरिस्थितीत स्तनांचा कर्करोग हा दुसऱ्या क्रमांकावर असल्याने याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीतील अधिक माहिती आपण पुढील भागात घेऊ.

## Schizophrenia...

**डॉ. कांचन व्यंकटेश खैराटकर (मो. : ८८८८८१५७८९)**

नमस्कार. आयुष्यात आपल्याला अनेक अनुभव येतात आणि कदाचित त्यामुळे आपल्याही व्यवहारात अनेक बदल होतात. पण जे बदल अगदीच अनैसर्गिक असतात त्यांना थांबविणे गरजेचे असतेच..

म्हणजे कसे? आपल्या अवतीभोवती असे काहीसे घडत असेल तर लक्ष वेधले जातेच. एखादा व्यक्ती घरात अगदी नित्य नेमाने धार्मिक आहे. सकाळी अगदी हसत खेळत बाहेर पडतो पण संध्याकाळी अगदी दारु पिऊन येतो आहे. वागण्याचे काही संदर्भच लागत नाहीत. एखादा कधीही केव्हाही कुणाशीही अखंड बडबड करत असेल. थांबतच नसेल. अगदी समोरच्याला ते जाणवत असेल. मित्र किंवा मैत्रीण यांच्याशी गप्पा ही बाब वेगळी आहे. मन मोकळे बोलणे हे वेगळे आहे. ते सहज असते. व्यवहारात अनेकदा चिडून बोलणे. आक्रमक होणे हे होत असतेच. अनेक प्रसंग येतात. पण ते नियंत्रित करता यायला हवे. एखादा / एखादी कुणाशीही संबंध ठेवत नसेल. एकटी राहत असेल. कुणातही फारशी मिसळत नसेल. एखादा / एखादी सतत मूड बदल होत असतील. अकारण मारहाण, शिव्या. एक दिवस उत्तम आणि एक दिवस उगाच बडबड. शिव्या अगदी पाण उतारा. एखादा / एखादी घरात जोरात भांडण आणि ऑफिस मध्ये अगदी काहीही घडले नाही असे वागत असेल आणि परत घरी आले की भांडण किंवा इतके नॉर्मल की काहीही घडले नाही असे वागणे असेल. सतत संशय, अविश्वास, समजून न घेणे असे असेल. वरीलपैकी काहीही घडत असेल किंवा याहीपेक्षा वेगळे असू शकेल. पण ही नॉर्मल बाब नाही. ही Schizophrenia ची सुरुवात किंवा तो व्याधी झालेला असू शकतो. हा एक मानसिक विकार आहे. अश्या व्यक्तींना सांभाळायला हवे पण जर व्याधी अधिक बळावला तर वेळीच उपचार घेणे गरजेचे आहे. हा genetic म्हणजे आनुवांशिक असूच शकतो. समजा वडील किंवा आई किंवा घरातील असे कुणी असेल तर तो genetic येऊ शकतो. वेळीच काळजी आणि उपचार घेणे गरजेचे असते.

Schizophrenia असणाऱ्या व्यक्तींना सोबत घेऊन जगणे सोपे नाही. या कारणाने अनेक घरं उद्ध्वस्त झाली. आत्महत्या झाल्या. संसार मोडले. पण जर सोबत देणारा किंवा देणारी व्यक्ती खंबीर असेल तर सर्व व्यवस्थित होऊ शकते.

आयुष्य एक तडजोड असतेच. आव्हान मोठे असू देत. पण लढणे गरजेचे आहे. आपल्या भोवती पाहा, तपासा आणि सांभाळा. प्रेम, विश्वास आणि वेळीच समुपदेशन आणि उपचार हे सर्व व्यवस्थित मार्गावर आणू शकतील.

## जोडीदार निवडा

### वधू पाहिजे

* **जय शिरीष देशपांडे**, जन्म दिनांक: ८ नोव्हेंबर १९९६, जन्मवेळ – सायंकाळी १९.०७, रास – कन्या, चरण ४थे, गण– देव, नाडी – आद्य, रक्तगट – O+VE ओ +, शाखा – देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, जन्मगाव – जळगाव (खान्देश), नक्षत्र – हस्त, वर्ण – वैश्य, उंची – ५.८, गोत्र – कामकायन, शिक्षण – BE, MBA–, वास्तव्य – ठाणे, नोकरी – सेल्स इंजिनियर (Auto Control Proses Instrumentation Ambarnath, Thane) उत्पन्न – वार्षिक रु.५ ते ७ लाख, अपेक्षा – पदवीधर, ब्राह्मण, मनमिळाऊ, नोकरी (प्राधान्य नाही), संपर्क– ९३२२८८६७४७
* **शशांक सदानंद धामणकर.** जन्म तारीख : २८.०८.१९८३, जन्म वेळ : सकाळी १०.२०, शिक्षण : B.E. Mechanical, नोकरी : B. E. Mechanical वार्षिक उत्पन्न : ९.५ लाख, ब्राह्मण पोटशाखा : कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र : आग्नरस, रक्तगट : O+ve, उंची : ५.८, वर्ण : सावळा, जन्म स्थळ : गोरेगाव (मुंबई), बांधा : मध्यम, जन्म–लग्न कुंडली : रास : मेष, गण : देव, नाडी : आद्य, चरण : प्रथम, गोत्र : आग्नरस, नक्षत्र : अश्विनी, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : श्री. सदानंद विश्वनाथ धामणकर, संपर्क क्रमांक : ९८९३६२७३०२ / ९२७०९९५१६३ / ७३७८३०७२७०, अपेक्षा : अनुरुप, पदवीधर, कोणत्याही ब्राह्मण शाखेची चालेल, नोकरीस प्राधान्य.
* **पुष्कर दिलीप मेहुणकर.** जन्म तारीख : ०८.०१.१९९०, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : हरीतस, उंची : ६.१, वर्ण : गोरा, शिक्षण : १२ वी पास (बी.सी.ए. दुसरे वर्ष), व्यवसाय : शेअर मार्केट, डे ट्रेडींग, वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख, अपेक्षा : मनमिळावु, नोकरी असलेली चालेल, संपर्क क्रमांक : ९८६९४१३०८६, ९८६९४६९१६१.
* **वेदप्रकाश उर्फ विनित सदाशिव पानसे :** जन्म तारीख : २३.०६.१९७९, वेळ : सायंकाळी ५.१०, जन्म ठिकाण : सातारा, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, शिक्षण : बी.कॉम, जी.डी.सी. ॲण्ड् ए., कॉम्प्युटर डिप्लोमा, उंची : ५.८, रक्तगट : AB+, वर्ण : गोरा, नोकरी : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग अंतर्गत, मराराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गात सहाय्यक लेखाधिकारी (वर्ग २) (राजपत्रित) पदावर, नोकरीत कायम, मासिक वेतन : रु. ९०,०००/–, गोत्र : मुद्गल, रास : वृषभ, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : सदाशिव हरी पानसे, संपर्कासाठी दूरध्वनी : ९३२६७२६६४८, ९५४५५१७१४९, अपेक्षा : सुसंस्कृत, अनुरुप, पदवीप्राप्त, संगणक ज्ञान, नोकरी करण्याची तयारी.
* **मनीष किशोर दाणी :** जन्म तारीख : २३.१०.१९९८, वेळ : सकाळी १२.३५, जन्म ठिकाण : संगमनेर, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, शिक्षण : Master Computer Science, उंची : ६, रक्तगट : A+, नोकरी : Cleverex Technology, IT Co. Pune, Software Engineer, वार्षिक उत्पन्न : रु. ६ लाख, गोत्र

: मुनीर भार्गव, रास : वृश्चिक, नाडी : अंत्य, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : किशोर मुरलीधर दाणी, संपर्कासाठी दूरध्वनी : ८३०८३४०७७२, ९५६१८९३०४९.

✻ **सुधांशु संजय कुरुलकर :** जन्म तारीख : १३.०४.१९८८, वेळ : रात्री २.५०, जन्म ठिकाण : सोलापूर, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : भारद्वाज, रास : कुंभ, गण : राक्षस, नक्षत्र : शततारका, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, उंची : ५.१०, रक्तगट : B+, शिक्षण : BE + PGDBM, नोकरी : Engineering & IT Services, वार्षिक उत्पन्न : ४९ लाख (Euro ५५,०००), मुलाचे सध्याचे वास्तव्य : Frankfurt, जर्मन, अपेक्षा : अनुरुप, उंची : किमान ५.२, संपर्कासाठी दूरध्वनी : ८७६७३९६५९१.

✻ **कौस्तुभ रेणुकादास कुलकर्णी :** जन्म तारीख : ०१.०८.१९९६, जन्म वेळ : सकाळी ७.१३, शिक्षण : B.Tech. (Mechanical), MSC (Finance) UK, नोकरी : वरिष्ठ कार्य सल्लागार, व्यवसाय विश्लेषक, शाखा : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र : वसिष्ठ, रक्तगट : O+ve, वर्ण : गोरा, जन्म स्थळ : नाशिक, बांधा : मध्यम, रास : कुंभ, गण : राक्षस, नाडी : आद्य, चरण : प्रथम, कौटुंबिक माहिती : वडिलांचे नाव : रेणुकादास रंगनाथ कुलकर्णी मो. ९७६९९७१८७९, आईचे नाव : विद्या रेणुकादास कुलकर्णी मो. ९७६९४७७६६०, अपेक्षा : अनुरुप.

## वर पाहिजे

✻ **तेजस्विनी अशोक कोटलगी** (घटस्फोटीत) : जन्म तारीख : ०१.०९.१९९१, शिक्षण : P. G. Diploma Mass Comm., नोकरी / व्यवसाय : फोटोग्राफी, Clothing Business, ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : काश्यप, रक्तगट : B+ve, उंची : ५.५, वर्ण : गोरा, रास : वृषभ, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : अशोक कोटलगी, संपर्कासाठी दूरध्वनी : ९९६७८४८१०६, ९८९२६१४८९८ अपेक्षा : मुंबई शहर स्थायिक, आधुनिक विचार सरणीचे कुटुंब, शाकाहारी, दिसायला देखणा, वयातील अंतर ३ पर्यंत.

✻ **निमिषा मनोज पटवर्धन** : जन्म तारीख : १२.०५.१९९८, जन्म वेळ : १६.४१, शिक्षण : Master in Pharmacy, नोकरी / व्यवसाय : Ozone Pharmaceuticals – New Delhi (Excutive), ब्राह्मण पोटशाखा : देशस्थ ऋग्वेदी, गोत्र : कोंडिल्य, रक्तगट : O+ve, उंची : ५, वर्ण : गोरा, जन्म स्थळ : ग्वालेर, रास : वृश्चिक, गण : देव, नाडी – मध्य, **कौटुंबिक माहिती :** वडिलांचे नाव : मनोज पटवर्धन, संपर्कासाठी दूरध्वनी : ९८९३४५४१५३ / स्वाती पटवर्धन ९९९३१७०४१८, अपेक्षा : Well settled, Supportive Family.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू-वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

Ravindra Deshpande

REC

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com



॥ संहतिः कार्यसाधिका ॥

# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

(सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक - एफ ३९७६)

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दूरध्वनी : २४३० २२७३ / २४३० ७५७३ ईमेल : aadrbm@gmail.com
संकेत स्थळ : www.adrbmm.in, GST No. : 27AAATA4113E1ZD



संदर्भ :

दिनांक :

**Result of Trienil Election for Excutive Manajing Committee (karykari Mandal) for the period - 2024-2027**

| Sr.No. | Name | Area | Group | Result |
|---|---|---|---|---|
| 1 | Mahendra Mohaniraj Gandhe | | President | Elected Unopposed |
| | | | | |
| 1 | Ramesh Ramrao Patil | Mumbai Collaba to Dadar Ghatkopar | Committee member | Elected Unopposed |
| 2 | Girish Vasant Kulkarni | Mumbai Collaba to Dadar Ghatkopar | Committee member | Elected Unopposed |
| 3 | Vinod Vithal Mandke | Mumbai Collaba to DadarGhatkopar | Committee member | Elected Unopposed |
| 4 | Prabhakar Pandurang Kulkarni | Bandra to Borivali | Committee member | Elected Unopposed |
| 5 | Anand K. Kulkarni | Bandra to Borivali | Committee member | Elected Unopposed |
| 6 | Ramchandra Parshuram Digavadek | Madhya Upnagare Mulund | Committee member | Elected Unopposed |
| 7 | Jagannath Krushnaji Joshi | Thane Dombivli | Committee member | Elected Unopposed |
| 8 | Milind Malharrao Sardeshmukh | Thane | Committee member | Elected Unopposed |
| 9 | Vijay Shantaram Chavhre | Thane Kalyan | Committee member | Elected Unopposed |
| 10 | Madhukar Ramrao Kulkarni | Marathwada Latur | Committee member | Elected Unopposed |
| 11 | Vinod Keshavrao Deshmukh | Marathwada Nanded | Committee member | Elected Unopposed |
| 12 | Dattatray Pandurang Aaradhye | Solapur | Committee member | Elected Unopposed |
| 13 | Vasudeo Shankar Joshi | Solapur | Committee member | Elected Unopposed |
| 14 | Rohini Ramchandra Tadvalkar | Solapur | Committee member women | Elected Unopposed |
| 15 | Ganesh Vadhavekar | Uttar Maharashtra jalgaon Bhusawal | Committee member | Elected Unopposed |
| 16 | Mandar Sharad Tagare | Uttar Maharashtra Nashik | Committee member | Elected Unopposed |
| 17 | Sunil Narayan Parkhi | Pune | Committee member | Elected Unopposed |
| 18 | Anil Shridhar Panse | Pune | Committee member | Elected Unopposed |
| 19 | Ashwinikumar Padmakar Upadhye | Pune | Committee member | Elected Unopposed |
| 20 | Jayant Sharad Deshpande | Pune | Committee member | Elected Unopposed |
| 21 | Ketki Kaustubh Kulkarni | Pune Kothrud | Committee member women | Elected Unopposed |
| 22 | Aniket Ashok Asthekar | Pune Kolhapur | Committee member | Elected Unopposed |
| 23 | Hari Shankar Mahashabde | Vidarbha Akola | Committee member | Elected Unopposed |
| 24 | Abhay Vinayak Joshi | Karnataka Belgavi | Committee member | Elected Unopposed |
| 25 | Vinayak Govind Joshi | Karnataka Belgavi | Committee member | Elected Unopposed |
| 26 | Nitin Digambar Shahapurkar | Gujrat Vadodara | Committee member | Elected Unopposed |

Above Candidates are decleared elected unapposed. Adv. Rajesh Mudholkar Chief Election Officer
Mumbai Date : 8/7/2024

संस्थेच्या त्रैवार्षिक २०२४-२०२७ च्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय वरीलप्रमाणे असून याची अधिकृत घोषणा दि. ११.०८.२०२४ रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये करण्यात

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## अमृत संस्थेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH